**नियमित खटला क्र.१९२/२००९**
सरकार वि. विजय देडगावकर
**निशाणी क्र. २१७**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३</u>**

देवा शपथ खरे सांगतो की,

माझे नाव :- धनंजय अन्नासाहेब शिरसाठ

वय :- ४३ वर्षे, धंदा :- व्यवसाय

रा. :- कोल्हार खु., ता. राहाता, जि. अहमदनगर

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस. जी. पाटील यांचेमार्फत ..</u>**

१. दि. ०६.११.२००८ रोजी मला व दुसरा पंच शाम सुंदर दळे यास सहा. पो. नि. लोणे यांनी कोठे बोलाविले होत ते मला आठवत नाही. हे मला सांगता येणार नाही की लोणी पोलीस ठाण्यात आरोपी विजय याच्या सहीचे हस्ताक्षराचे नमुने घेण्यासाठी पंचनाम्याकरिता बोलावले होते. आता मला दाखविलेल्या पंचनाम्यावरील क्र. २ ची सही माझी नाही. त्यातील मजकुराविषयी मला माहिती नाही. माझ्या गावात माझ्या नावाचा मी एकमेव व्यक्ती असुन तसा दुसरा व्यक्ती नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ श्री. एस. जी. पाटील यांच्या तोंडी विनंतीवरुन भा.पु.का. १५४ अन्वये साक्षीदाराची उलटतपासणी घेण्याची संधी देण्यात येत आहे.**

२. हे म्हणणे खरे नाही की दि. ०६.११.२००८ रोजी मला व दुसरा पंच शाम सुंदर दळे यास सहा. पो. नि. लोणे यांनी लोणी पोलीस ठाण्यात आरोपी विजय देढगावकर याच्या सहीचे हस्ताक्षराचे नमुने घेण्यासाठी पंचनाम्याकरिता बोलावले होते. हे मला सांगता येणार नाही की त्यावेळी माझ्या समक्ष आरोपी विजयचे सहा वेळा सहा को-या कागदावर हस्ताक्षराचे नमुने घेण्यात आले होते, तसेच सहा स्वतंत्र कागदावर त्याच्या सहा सह्यांचे नमुने घेण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की सदर कारवाईचा माझ्या समक्ष पंचनामा करून पोलीसांनी मला वाचून दाखविला व तो बरोबर असल्यामुळे मी त्यावर सही

केली.

३.		दि.१४.११.२००८ रोजी मला व दुसरा पंच शाम सुंदर दळे सहा.पो.नि. घाडगे याने रेकॉर्ड जप्तीच्या पंचनाम्यासाठी बोलावल्याचे मला आठवत नाही. आता मला दाखविलेल्या पंचनाम्यावरील क्र.२ च्या चार सह्या माझ्या नाहीत. त्यातील मजकुराविषयी मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की बॅंकेचे शाखा व्यवस्थापक श्री. फारुकी यांनी सर्व आरोपींचे सोने तारण कर्जाचे अर्ज, सोने मुल्यांकन अधिकारी श्री व्ही.सी.वर्मा यांचा अहवाल, बॅंकेचे डबल लॉक रजिस्टर, आरोपी विजयने बॅंकेला दिलेले अंडर टेकींग लेटर इत्यादी कागदपत्रे जप्त करण्याकामी पंच म्हणून बोलावले होते. हे मला माहित नाही की सदर कारवाईचा पंचनामा माझ्यासमक्ष झाला होता. हे म्हणणे खरे नाही की त्या पंचनाम्यातील मजकुर वाचुन मी त्यावर सही केली होती.

४.		हे म्हणणे खरे नाही की दि.१६.११.२००८ रोजी मला व दुसरा पंच शाम सुंदर दळे यास सहा.पो.नि.घाडगे यांनी कोठेही बोलावले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की मला त्यावेळी मुद्देमाल जप्तीच्या पंचनाम्यासाठी कॉर्पोरेशन बॅंक शाखा कोल्हार येथे बोलावले नव्हते. आता मला दाखविलेल्या पंचनाम्यावरील क्र.२ ची सही माझी नाही. त्यातील मजकुराविषयी मला माहित नाही.

५.		हे म्हणणे खरे नाही की दि.१८.११.२००८ रोजी मला व दुसरा पंच शाम सुंदर दळे यास सहा.पो.नि.घाडगे यांनी कोठेही बोलावले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की मला त्यावेळी हस्ताक्षर व सह्या घेतांना केलेल्या पंचनाम्यासाठी लोणी पोलीस ठाण्यात बोलावले होते. आता मला दाखविलेल्या पंचनाम्यावरील क्र.२ ची सही माझी नाही. त्यातील मजकुराविषयी मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी माझ्या समक्ष जया देढगावकर, अजय देढगावकर, रविंद्र मैड, हैाशिराम देवकर, बाळासाहेब खर्डे व पांडुरंग देवकर यांच्या सहयांचे व हस्ताक्षरांचे नमुने घेण्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी माझ्या समक्ष सर्व नमुने घेउन पोलीसांनी पंचनामा केला व मी वाचुन त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की आरोपींना वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपीं करिता विधिज्ञ श्री. जे. ए. जोशी यांचे मार्फत</u>** :-

नाकारला

श्रवणोत्तर स्विकृती,

सही/-
( एस. व्ही. खैरे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र. १, राहाता.

दि. २३.०१.२०२५